महाराष्ट्र शासन
धर्मादाय सह आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद
बाबा पेट्रोल पंपाजवळ, अदालत रोड, औरंगाबाद
फोन नं.०२४०-२३३११६१, फॅक्स नं.०२४०-२३४११६१
Email ID- jtcc.au-mh@gov.in
supdtest.au-mh@gov.in

जा. क्र. /धउआ/ आस्था/ 2010 /२०२१ दि.१७.१२.२०२१

# निविदा सुचना

मा. धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांच्या अखत्यारीतील औरंगाबाद, जालना व नांदेड कार्यालयांसाठी शिपाई पदावरील कर्मचारी पुरविण्यासाठी नोंदणीकृत ठेकेदार/कंपनी/ संस्थेकडुन निविदा मागविण्यात येत आहे.

शिपाई पदवार कंत्राटी पध्दतीने आवश्यक असलेल्या कर्मचा-यांचा गोषवारा खालील प्रमाणे आहे.

| कार्यालयाचे नाव | आवश्यक असलेल्या शिपाई पदावरील कर्मचा-यांची संख्या |
|---|---|
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद | २ |
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, जालना | १ |
| सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नांदेड | २ |

सदरील निविदेच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहेत.

१. निविदे सोबत जोडलेले सर्व कागदपत्रे साक्षांकीत असावेत.

२. निविदा धारकास अस्तीत्वात असलेल्या अनुषांगीक सर्व कायद्यांचे पालन करणे बंधनकारक राहील.

३. खाजगी कर्मचा-यांचा भविष्य निर्वाह निधी व राज्य कामगार विमा योजनांची रक्कम प्रचलीत दरानुसार मुख्य मालक म्हणुन या कार्यालयातर्फे आपल्या दरात समाविष्ठ करुन त्याचा भरणा संबंधीत कार्यालयात केल्याची पावती या कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

४. खाजगी कर्मचा-याची वयोमर्यादा कमीत कमी १८ वर्षे व जास्तीत जास्त ३८ वर्षे राहील.

५. खाजगी कर्मचा-याचे शिक्षण किमान १२ वी पास असणे आवश्यक आहे. त्याच बरोबर विशेष शिक्षण जसे की - टंकलेखन व संगणक अनुभव असणा-या खाजगी कर्माचा-यास प्राधान्य देण्यात यावे.

..२.

६. व्यसनाधीन, गुन्हेगारी पार्श्र्वभुमी असणा-या खाजगी कर्मचा-यास नियुक्ती देता येणार नाही. खाजगी कर्मचारी नियुक्ती पुर्वी अशा कर्मचा-याची चारीत्र्य पडताळणी करुन घेणे बंधनकारक राहील.

७. बेशीस्त वर्तन करणा-या कर्मचा-यास या कार्यालयाने निर्देशीत केल्यावर त्वरीत काढुन घ्यावे लागेल.

८. खाजगी कर्मचा-यांना आठवडी सुटी देणे बंधनकारक राहील. किमान वेतनामध्ये साप्ताहीक सुटीचा समावेश असेल.

९. सदरील कर्माचा-यांना नियमाप्रमाणे वार्षिक बोनस देणे कंत्राटदाराची जबाबदारी राहील.

१०. सदरील कर्मचा-यांना अपघात झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील. तसेच, कर्मचा-याकडुन कार्यालयास / इतरास नुकसान झाल्यास खर्चाची पुर्तता करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

११. नियमीत आस्थापनेवरील कर्मचा-यांस मिळणारे कोणतेही फायदे कंत्राटी कर्मचा-यांना देय राहणार नाही.

१२. कुठलेही कारण न देता, कुठल्याही वेळी कंत्राट रद्द करण्याचे सर्व अधिकार धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांना असतील.

१३. कंपनी/ एजन्सी /संस्थेतर्फे काम करणा-या कर्माचा-यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व या कार्यालयावर राहणार नाही.

१४. निविदा मंजुर झाल्यावर कंत्राटदारास या कार्यालयाशी करार करावा लागेल.

१५. निविदा अर्ज पांढ-या कागदावर टंकेलिखीत करुन ज्या कार्यालयासाठी निविदा भरण्यात येत आहे त्या कार्यालयाचे नाव, शिपाई पदाच्या सेवेसाठी माणसी दर नमुद करुन दिनांक ३०.१२.२०२१ पर्यंत वरील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत बंद लिफाफ्यात मा. धर्मादाय सह आयुक्त, औरंगाबाद यांचेकडे सादर करावी. बंद लिफाफ्यावर शिपाई पदासाठी निविदा असे नमुद करणे आवश्यक आहे. निविदे सोबत संस्था / कंपनी / एजन्सी शासनमान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडणे आवश्यक आहे.

१६. सदरील निविदा सुचना https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

17/12/21

धर्मादाय सह आयुक्त,
औरंगाबाद.

दिनांक -

स्थळ - औरंगाबाद

प्रत -

१. कार्यालयीन नोटीस बोर्ड

२. https://charity.maharashtra.gov.in या संकेत स्थळासाठी.